# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/१०/२०२५ ( शनिवार )**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## ३ आरोपी अटक, १४ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## खापा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन खापा**:— दिनांक १०/१०/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा जवाहर टी पाईन्ट येथे नाकाबंदी केली असता एक चारचाकी वाहन क्र एम.एच. ४० बी.एल. ६९४१ एस.एम.एल. येतांना दिसले. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक **आरोपी नामे १) जितेन्द्र चन्द्रभान गाहटे, वय ३२ वर्ष, रा कुंडई, ता. बिछवा, जि छिंदवाडा २) वाहन मालक अखाडया पिलाजी खापरे, वय ६२ वर्ष, रा घाटपेंढरी ता पारशिवनी, जि नागपूर तसेच त्यांचा साथीदार आरोपी क्रं ३) दिलीप नरेश घागरे, वय ३४ वर्ष, रा बिछवा, जि छिंदवाडा, हे वाहनात मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन १) पानमसाला राजश्री ब्रॅड,२) पानमसाला विमल ब्रॅड ,३) जनम ५३५ ,४) पानमसाला रजनीगंधा ५) सुगंधीत तंबाखु च्वुईग ५) सुगंधीत तंबाखु व्ही —१ ६) सुगंधीत तंबाखु ब्लॅक लेबल १८ अशा कंपीनाचा एकुण १७८.२८५ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती २,३५,७५१ /— रूपये आणि चारचाकी वाहनक्र एम.एच. ४० बी.एल. ६९४१ एस.एम.एल. किंमती १२,००,०००/—रूपये असा एकुण १४,३५,७५१ /—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे खापा येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात ग्रामभेटी घेवुन ग्रामस्थांसोबत पोलीसांनी साधला सुसंवाद

दिनांक १०/१०/२०२५ नागपुर ग्रामीण जिल्हयात उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागातील गावांना भेटी देवुन तेथील नागरिकांची ग्रामसभा घेवुन त्यांच्याशी सुसंवाद साधाला.

पोलीस स्टेशन बेला अंतर्गत श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी **बेला** येथील ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन कुही अंतर्गत श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांनी **मांढळ** गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत **टाकळी भंसाळी** गाव आणि  कळमेश्वर अंतर्गत **उबाळी** गावात श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांनी भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांनी **वराडा** गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांनी **लोहारा** गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत श्री रमेश बरकते उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी **चिचाळा** येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली.

**सदर ग्रामसभेला उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह संबधीत पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी आणि तेथील अंमलदार हजर होते. ग्रामस्थांची ग्राम सभा घेवुन पोलीसांनी ग्रामस्थांसोबत संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन त्यांचे निराकरण करण्यात आले. तसेच गावातील अवैध धंदयाबाबत माहीती गावकऱ्यांनी तात्काळ पोलीसांना दयावी असे**

अवाहन पोलीसांनी केले. तसेच सदर ग्रामसभेत पोलीसांनी सायबर क्राईम आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी, रस्ते सुरक्षा ,महीला व बालके यांची सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली. सदर ग्रामसभेला गावकऱ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.










## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६४२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ११/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३३ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९आरोपी आणि

पोलीस स्टेशन केळवद येथे ३ आरोपी अशा एकुण ११९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २७ आरोपी अशा एकुण ५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २८ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १४७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने